सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००४१७-२०१२

नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०१२

निशाणी क्र.२५३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ड यांनी मयत प्रतिवादी क्र.११ चे वारस अभिलेखावर घेण्याकरिता दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी क्र.१ड यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादी क्र.११ जगन्नाथ भास्कर घाडी हे दि. २८/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.११ चे अर्जात नमुद केल्या प्रमाणे वारस आहेत. तरी सदर प्रतिवादी क्र.११ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास व तशी दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश करावा असे नमुद केले आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.२५४ सोबत दाखल केलेल्या मयत प्रतिवादी क्र.११ जगन्नाथ भास्कर घाडी यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.११ जगन्नाथ भास्कर घाडी हे दि.२८/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा अर्ज वादीने मुदतीत दाखल केलेला नाही. परंतु अर्ज नि.क्र.२५१ येथे आदेश पारित करुन मयत प्रतिवादी क्र.११ यांचे विरुध्द झालेली अबेटमेंट वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर रद्द करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच अर्ज

नि.क्र.२५२ येथे आदेश पारित करुन मयत प्रतिवादी क्र.११ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्या नंतर माफ करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, वादी यांना प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - **आदेश** -

१. अर्ज नि.क्र.२५३ मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.१ड यांनी अर्ज नि.क्र.२५१ व २५२ मध्ये पारित केलेली खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर प्रस्तुत अर्जात नमुद केल्या प्रमाणे मयत प्रतिवादी क्र.११ यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट करावे व १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.02.11 16:36:33 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः ११/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड